महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:- १४ जानेवारी, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२१-प्रवेश प्रमाणपत्राबाबत**

**संदर्भ:-** आयोगाचे प्रसिध्दीपत्रक क्रमांक सीएमए-०४२१/सीआर-०१/२०२१/जाहिरात, दिनांक २८ डिसेंबर, २०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजी नियोजित राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२१ आयोगाच्या संदर्भिय प्रसिध्दीपत्रकाद्वारे पुढे ढकलण्यात आली होती. आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार प्रस्तुत परीक्षा **रविवार, दिनांक २३ जानेवारी, २०२२** रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

**२.** प्रस्तुत रविवार, दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजी नियोजित परीक्षेकरीता आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांना वितरित करण्यात आलेल्या प्रवेश प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश प्रमाणपत्रामध्ये नमूद परीक्षा उपकेंद्रावर संबंधित उमेदवाराला प्रवेश देण्यात येईल.

**३.** कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्याबाबत शासनाकडून घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याची संधी देण्यात आली होती. त्यानुसार अर्ज सादर केलेल्या संबंधित उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवरील उमेदवाराच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**४.** परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**५.** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध होण्यामध्ये अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in व support-online@mpsc.gov.in या ईमेल व/अथवा १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग